गोपाल कृष्ण खन्ना

आधार क्रमांक

6856 2923 9352

॥ इच्छापत्र ॥

मी, गोपाल कृष्ण गोस्वामी उर्फ गोपाल कृष्ण खन्ना, कै. आनंद स्वरूप खन्ना यांचा पुत्र, जन्म : 14 ऑगस्ट 1944 रोजी आणि इस्कॉन दिल्ली, हरे कृष्ण हिल, संत नगर, कैलाश पूर्व, नवी दिल्ली येथील रहिवासी, माझी यापूर्वीची सर्व इच्छापत्रे किंवा त्यांच्या पुरवण्या रद्द करून जाहीर करतो की, हे माझे शेवटचे इच्छापत्र मी 23 नोव्हेंबर 2024 रोजी, इस्कॉन दिल्ली, हरे कृष्ण हिल, संत नगर, कैलाश पूर्व, नवी दिल्ली येथे करीत आहे.

हे माझे शेवटचे इच्छापत्र आहे, जे मी 23 नोव्हेंबर 2023 रोजी करीत आहे. मी एक संन्यासी आहे आणि माझ्यावर कोणीही अवलंबून नाही.

मी घोषित करतो की, माझी तब्येत चांगली आहे आणि माझे मन सुदृढ आहे. मी हे इच्छापत्र कोणाच्याही आणि कोणत्याही प्रकारच्या मनधरणी शिवाय किंवा जबरदस्तीशिवाय आणि माझ्या एकट्याच्या विचाराने घेतलेल्या निर्णयातून केलेले आहे.

मी खालील भक्तांची माझ्या इच्छापत्राचे व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करीत आहे:-

वैष्णव महाराज (भारतासाठी) +91 9897 903 111

जनार्दन महाराज (भारतासाठी) +91 9897 906 111

ऋषी कुमार दास (भारतासाठी) +91 9267 915 774

अंबरीश महाराज (रशियासाठी) +7 925 600 0973

उमापती (पूर्व आफ्रिकेसाठी)

+254 733 617744

जर माझ्या इच्छापत्राच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या या भक्तांपैकी कोणीही माझ्यापूर्वी दिवंगत झाले, तर या मृत्युपत्राचे जे कोणी व्यवस्थापक जिवंत असतील ते माझ्या इच्छापत्राचे व्यवस्थापक असतील.

मी इस्कॉन इंडियाचा आणि बी.बी.टी. (भक्तिवेदांत बुक ट्रस्ट) चा ट्रस्टी आणि गव्हर्निंग बॉडी कमिशनर आहे. या व्यतिरिक्त मी अन्य कोणत्याही ट्रस्टचा विश्वस्त नाही, याला अपवाद म्हणजे 'इस्कॉन सेवा ट्रस्ट' (ब्युरो द्वारा स्थापित व नियंत्रित ट्रस्ट) जो इस्कॉन दिल्लीमध्ये स्थित आहे व सध्या निष्क्रिय आहे.

इस्कॉनच्या गव्हर्निंग बॉडी कमिशन आणि आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापकाचार्य श्रील प्रभुपाद यांनी त्यांच्या पुस्तकांमध्ये प्रतिपादित केलेल्या शिकवणींशी मी सदैव एकनिष्ठ राहिलो आहे. माझ्या सर्व शिष्यांनीही गव्हर्निंग बॉडी कमिशनच्या आदेशांचे पालन करावे असे मला मनापासून वाटते. मी स्वतः कधीही इस्कॉनच्या बाहेर एक पाऊलही टाकलेले नाही आणि माझी इच्छा आहे की, माझ्या शिष्यांनीही काहीतरी सोपा मार्ग शोधण्यासाठी इकडे तिकडे पाहण्यापेक्षा आपल्या सेवा इस्कॉनमध्येच द्याव्यात.

गुरु दोन प्रकारे प्रकट होतात: वपु आणि वाणी. तुम्ही अनेकदा ऐकले असेल की, गुरूचा वपु संग हा तात्पुरता आहे, वाणी संग हा शाश्वत आहे. तर माझ्या सर्व सूचना मी श्रील प्रभुपादांच्या पुस्तकांतूनच घेतलेल्या आहेत आणि त्यामुळे त्या तशाच प्रतिबिंबित झाल्या आहेत. श्रील प्रभुपाद म्हणाले होते, "तुम्ही आपापसात किती सहकार्य करता यावरून तुमचे माझ्यावरचे प्रेम आहे हे दिसून येईल." आणि माझ्या सर्व शिष्यांकडून माझी सुद्धा हीच अपेक्षा आहे की, त्यांनी आपापसात आणि इस्कॉनमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सदैव सहकार्य करावे.

भारताबाहेर माझे निधन झाले तर माझा पार्थिव देह वृंदावन किंवा मायापूर येथे आणून तिथे माझी समाधी बांधण्यात आली तर मी कृतज्ञ राहीन. जर माझे निधन उत्तर भारतात माझे तर माझी समाधी वृंदावनात असावी असे मला वाटते आणि जर मी मायापूरच्या जवळपास माझा देह सोडला तर माझी समाधी मायापुरात असावी अशी माझी इच्छा आहे. वृंदावनमध्ये एक भूखंड आहे जिथे माझ्या शिष्यांना माझ्यासाठी घर बांधावयाचे होते. मी त्यासाठी कधीच प्रोत्साहन दिले नाही. माझी इच्छा आहे की, ही विशिष्ट जमीन त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रकल्पासाठी इस्कॉन वृंदावनला दान करावी. जिथे माझे शिष्य सेवारत आहेत अशा जवळपास प्रत्येक मंदिरात मला माझे वेगवेगळे चित्र दिसते. त्यांना आवडणारे कोणतेही चित्र (फोटो) ते निवडू शकतात. ही प्रथा माझ्या निधनानंतरही चालू शकते.

माझ्याकडे माझ्या नावावर कोणतीही मालमत्ता, रोख रक्कम, बँकेत ठेव, लॉकर, वाहने, किंवा अन्य कोणतीही मालमत्ता नाही. इस्कॉनमध्ये माझ्या व्यवस्थापनाखालील सर्व विभागांमधील संपूर्ण मालमत्तेची इस्कॉनच्या नावावर कायदेशीररीत्या नोंदणी झालेली आहे आणि माझ्या नावावर 1977 मध्ये श्रील प्रभुपादांनी भेट दिलेले रोलेक्सचे मनगटी घड्याळ, माझा लॅपटॉप आणि दोन मोबाईल फोन वगळता काहीही नाही. माझी इच्छा आहे की हे घड्याळ माझ्या एका शिष्याला सुपूर्द करावे ज्याने मला श्रील प्रभुपादांची सेवा करण्यास मदत केली. सर्व लॉगिन आणि पासवर्ड असलेला लॅपटॉप आणि माझे मोबाईल फोन मी शरीर सोडताना जो भक्त माझा सचिव असेल त्याच्या ताब्यात असेल. माझे कपडे आणि स्वेटर माझ्या सहाय्यकांद्वारे शिष्यांना आणि इतर भक्तांना वाटले जाऊ शकतात. वेगवेगळ्या शिष्यांनी विविध ठिकाणाहून आणलेल्या माझ्या काही व्याख्यानांचे प्रतिलेख वगळता मी कोणतेही पुस्तक लिहिलेले नाही. आणि माझ्या व्याख्यानांच्या या प्रतिलेखांवर माझा कोणताही कॉपीराइटचा हक्क नाही.

माझी एकमेव व वास्तविक संपत्ती ही माझे वैयक्तिक अर्चाविग्रह व शाळीग्राम आहेत आणि त्यांची पूजा कोणत्याही एकाच व्यक्तीने करू नये अशी माझी इच्छा आहे. आणि म्हणून माझी इच्छा आहे की, माझ्या शाळीग्राम शिला आणि अर्चाविग्रहांची सेवा व पूजा श्री श्री राधा पार्थसारथी मंदिर, इस्कॉन दिल्ली, श्री श्री राधा राधिका रमण मंदिर, इस्कॉन पंजाबी बाग या मंदिरांमधील वेदीवर करावी आणि माझ्या व्यवस्थापनाखालील विभागातील इतर मंदिरांमध्ये विभागली जावी. माझी अशी इच्छा असण्याचे कारण हे आहे की, जर अर्चाविग्रह व शाळीग्राम मंदिराच्या वेदीचा भाग असतील तर ते सुरक्षित राहतील आणि जर त्यांची एखाद्या व्यक्तीद्वारे पूजा अर्चा केली गेली तर त्यांचा परित्यागही केला जाऊ शकतो. मी थोडीशी लक्ष्मी (आपण कृष्णाच्या सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या पैशाचे वर्णन 'लक्ष्मी' असे करतो) ठेवली आहे आणि तिचा विनियोग माझ्या निधनाच्या वेळी चालू असलेल्या इस्कॉनच्या वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये विभागून केला जाऊ शकतो. अमेरिकेमध्ये माझा शिष्य जगन्नाथ प्रिय दास सोबत माझे एक संयुक्त बँक खाते आहे आणि माझे ग्रीन कार्ड सुरक्षित करण्यासाठी, मी या अमेरिकन खात्यात व्यवहार केले आहेत. गेल्या 4 वर्षांपासून या

खात्यामध्ये 3000 डॉलर्स शिल्लक आहेत. माझ्यावर कोणतेही वैयक्तिक कर्ज नाही किंवा मी कोणाचेही व्यक्तिगत देणे लागत नाही.

मी या इच्छापत्राद्वारे माझ्या डॉक्टर शिष्यांची नियुक्ती करतो आहे जे सध्या वैयक्तिकरीत्या वैद्यकीय सल्लागार म्हणून माझी सेवा करत आहेत, आणि जेव्हा मी स्वतः या बाबतीत निर्णय घेण्यासाठी सक्षम स्थितीत नसेन, तेव्हा माझे वैद्यकीय उपचार आणि वैयक्तिक काळजी हे ठरवण्याचे सर्वाधिकार त्यांना देत आहे.

या डॉक्टरांची नावे अशी आहेत:-

डॉ. द्वारकाधीश दास

डॉ. कृष्ण प्रिय दास

डॉ अद्वैत आचार्य दास (वॉशिंग्टन)

डॉ. राधा वल्लभ दास

डॉ. अजय चैतन्य दास

माझे निधन झाल्यानंतर, सर्व शिष्यांनी स्वतंत्र न राहता या महान चळवळीतील ज्येष्ठ भक्तांपैकी कोणाचाही आश्रय घेतल्यास आणि श्रील प्रभुपादांनी स्थापन केलेल्या आणि प्रदान केलेल्या व्यवस्थापन प्रणालीचे पालन केल्यास मला खरोखर आनंद होईल आणि कृतज्ञता वाटेल.

माझ्या निधनानंतर माझ्या सर्व शिष्यांनी खालीलप्रमाणे वागावे व आचरण करावे असे निर्देश मी देतो:

1. कृष्णकृपामूर्ती अभयचरणारविंद भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद, आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघांचे (ISKCON) चे संस्थापकाचार्य यांचा सर्वोच्च शिक्षा गुरु म्हणून सदैव स्वीकार करा.

2. नेहमी इस्कॉनच्या गव्हर्निंग बॉडी कमिशनला (GBC) इस्कॉनचे सर्वोच्च व अंतिम व्यवस्थापन अधिकारी आणि श्रील प्रभुपादांचे प्रतिनिधी म्हणून स्वीकारा आणि त्यांच्या सूचनांचे आणि निर्देशांचे पालन करा.

3. आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) आणि श्रील प्रभुपाद यांचे अनुकरणीय व आदर्श प्रतिनिधी बनण्यासाठी तुमचे जीवन समर्पित करा.

4. ही चळवळ पुढे नेण्यासाठी इस्कॉनच्या इतर सर्व भक्तांबरोबर पूर्ण सहकार्य करा.

5. जेव्हा तुमच्यापैकी काही भक्त गुरू आणि संन्यासी बनण्यास पुरेशी प्रगती करतील, तेव्हा त्या विशिष्ट सेवा स्वीकारा आणि गव्हर्निंग बॉडी कमिशनच्या अधिकृत प्रक्रियेअंतर्गत कार्य करा.

6.  इस्कॉन कधीही सोडू नका; सर्वप्रथम, स्वतःला इस्कॉनचे सदस्य समजा. इस्कॉनशी कधीही भांडू नका आणि आपापसातील अंतर्गत मतभेद वैष्णव पध्दतीने दूर करा.

7.  गव्हर्निंग बॉडी कमिशनद्वारा अधिकृत नसलेल्या व्यक्ती किंवा समूहाशी कधीही संलग्न होऊ नका.

8.  श्रील प्रभुपादांच्या पुस्तकांचा नियमितपणे व गंभीरतापूर्वक अभ्यास करा, दररोज किमान 16 माळांचा जप करा आणि एकादशी व विशेष उत्सवांच्या दिवशी किमान 25 माळांचा जप करा. मांसाहार निषिद्ध, नशापान निषिद्ध, जुगार निषिद्ध आणि व्यभिचार निषिद्ध या चार नियामक तत्वांचे काटेकोरपणे पालन करा.

9.  इस्कॉनला एक शक्तिशाली संघ बनविण्यासाठी कार्य करा.

10.  इस्कॉनच्या कार्यासाठी तुमचा वेळ आणि संसाधने दान करणे नित्य सुरू ठेवा.

मला सांगावेसे वाटते की, भक्त म्हणून माझे सर्व प्रयत्न हे श्रील प्रभुपाद आणि इस्कॉनची सेवा करण्यासाठी आहेत आणि माझ्या अर्चाविग्रहांशिवाय माझे स्वतःचे असे काहीही नाही. म्हणून, मी पुढे निर्देश देतो की,

कसलीही मालमत्ता, मंदिरे, प्रतिष्ठापना; आणि मी किंवा  माझ्या शिष्यांनी प्रेरित किंवा निर्देशित केलेल्या प्रकल्पांसह कोणतीही मालमत्ता, जी.बी.सी.च्या आश्रयाखाली आणि निर्देशांखाली कायम राहिली पाहिजे, जी इस्कॉनची सर्वोच्च व अंतिम व्यवस्थापकीय अधिकारी आहे.

"तुम्ही करीत असलेल्या श्रील प्रभुपादांच्या सेवेबद्दल आणि त्यांच्याविषयी अपार प्रेमाबद्दल धन्यवाद. तुमची सेवा करणे हा माझा विशेष बहुमान आहे."

श्रील प्रभुपाद, माझे आध्यात्मिक गुरु, इस्कॉनचे संस्थापकाचार्य, सर्वोच्च शिक्षा गुरू आणि आध्यात्मिक जगतातील भगवान कृष्णाचे शुद्ध भक्त, यांनी संपूर्ण जगाला राहण्यासाठी बांधलेल्या या विशाल घरात मला आश्रय दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझ्या सर्व शिष्यांनी त्या घरात राहावे, कृष्णभावनामृताचे सर्वोच्च तत्त्वज्ञान आत्मसात करावे आणि त्याहीपेक्षा उच्च म्हणजे कृष्णभावनेच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास व प्रत्यक्षात आचरण करावे. हरे कृष्ण!

घोषणा:

मी घोषित करतो की, या इच्छापत्रामध्ये सादर केलेली माहिती, माझ्या माहितीनुसार, सत्य आणि पूर्ण आहे.

स्वाक्षरी : गोपाल कृष्ण खन्ना.

नाव आणि पद

गोपाल कृष्ण गोस्वामी (संन्यासी, इस्कॉन जी.बी.सी., बी.बी.टी. विश्वस्त आणि अध्यक्ष इस्कॉन ब्युरो)

तारीख : 9 नोव्हेंबर 2023